**शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी भरारी पथके आणि दक्षता पथके स्थापन करणेबाबत**

# महाराष्ट्र शासन

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**

**शासन निर्णय क्र.**शापोआ-२००९/प्र.क्र. २०७/प्राशि-४,

**मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक : १** जून, २००९

**प्रस्तावना :** शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यामध्ये इ.१ ली ते ५ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत होती. मागील आर्थिक वर्षापासून ही योजना इ.६ वी ते ८ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठीही राबविण्यास सुरुवात झालेली आहे. राज्यामधील शाळांमधून ही योजना राबवित असताना विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप कमी करणे, निकृष्ट प्रतीचा आहार मुलांना देणे, आहाराचे वाटपच न करणे, अशा स्वरुपाच्या तक्रारी शासनास वारंवार येत आहेत. त्यामुळे या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी भरारी आणि दक्षता पथकांमार्फत शाळांमध्ये अचानक तपासण्या करणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे:-

**शासन निर्णय :** शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली भरारी पथक स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. जिल्हा स्तरावरील भरारी पथक कार्यान्वित करण्यासाठी जिल्हापरिषदेमधील किंवा जिल्हयातील कोणत्याही विभागातील एक अधिकारी आणि दोन कर्मचारी यांची भरारी पथकामध्ये

नियुक्ती करुन या पथकामार्फत जिल्हयातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित होत आहे किंवा कसे, याबाबत तपासणी करण्यात यावी.

३. या भरारी पथकामार्फत त्या जिल्हयामधील ग्रामीण तसेच नागरी भागातील(महानगरपालिका- नगरपालिका) शाळांची त्याचप्रमाणे खाजगी संस्थांच्या शाळांचीही तपासणी करण्यात यावी.

४. शिक्षणाधिकारी(प्राथमिक),जिल्हापरिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिका-यांची मान्यता घेऊन वेळोवेळी भरारी पथकांमध्ये पाठविण्यासाठी जिल्हयातील कोणत्याही अधिकारी/कर्मचा-यांची नांवे निश्चित करावीत. त्यानंतर संबंधित पथकास शाळा तपासणीचा कार्यक्रम निश्चित करुन द्यावा. भरारी पथकाचा शाळा तपासणीचा कार्यक्रम गोपनीय ठेवण्यात यावा, जेणेकरुन अचानक शाळा तपासणी होऊन वस्तुस्थिती निदर्शनास येईल. भरारी पथक कार्यान्वित होण्यासाठी एक अधिकारी आणि किमान दोन कर्मचारी यांची वेळोवेळी नियुक्ती करण्यात यावी.

५. प्रत्येक जिल्हयामध्ये दरमहा किमान १० शाळांची भरारी पथकामार्फत तपासणी करण्यात यावी. भरारी पथकास शाळा तपासणी करताना आढळून आलेल्या बाबी, भरारी पथकाच्या प्रमुखाने तीन दिवसांच्या आत अहवाल सादर करुन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी(प्राथमिक) यांच्या निदर्शनास आणाव्यात. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर ज्या शाळांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटी आहेत त्या शाळांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यात यावी. मात्र ही योजना राबवित असताना गैरव्यवहार होत असल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

६. शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी क्षेत्रीय यंत्रणेकडून व्यवस्थितरित्या करवून घेण्यात येत आहे, हे तपासण्यासाठी शिक्षण संचालक(प्राथमिक) यांचे नियंत्रणाखाली त्यांच्या कार्यालयात तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई येथे उपसचिव(प्राथमिक) यांच्या नियंत्रणाखाली दक्षता पथक गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. सदरच्या दक्षता पथकासाठी वेळोवेळी एक अधिकारी व किमान एक कर्मचारी यांची नियुक्ती करुन ती कार्यान्वित करण्यात यावीत. शिक्षण संचालनालय स्तरावरील तसेच शासन स्तरावरील दक्षता पथकांनी दरमहा प्रत्येकी किमान २ दौरे करुन शाळांना भेटी देणे आवश्यक आहे.

८. बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत असलेल्या शाळांमध्ये शालेय पोषण आहार कार्यक्रमाची अंमलबजावणी तपासण्यासाठी शिक्षण उपसंचालक,मुंबई यांच्या नियंत्रणाखाली त्यांच्या कार्यालयात भरारी पथक गठीत करुन शाळा तपासण्यात याव्यात.

९. शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करुन घेण्यासाठी भरारी पथकांनी/दक्षता पथकांनी तपासणी करण्याच्या बाबी संदर्भात सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये माहिती नमूद करण्यात आलेल्या आहेत.

१०. प्रत्येक जिल्हयाच्या भरारी पथकांनी केलेल्या शाळा भेटी कार्यक्रमाची माहिती संबंधित शिक्षणाधिकारी(प्राथ.)तसेच शिक्षण उपसंचालक,मुंबई यांनी e-mail द्वारे परिशिष्ट "ब " मधील तक्त्यात सचिव,शालेय शिक्षण यांच्या अवलोकनासाठी maha.mdm.@ rediffmail. com या e.mail address वर दरमहा दहा तारखेच्या आत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

११. शालेय पोषण आहार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वरीलप्रमाणे भरारी पथकांमार्फत अचानक तपासण्या करण्यात येणार असल्या तरी संबंधित यंत्रणांनी नियमित तपासण्याही करणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर **२००९०६०१२०५५१८००१** या क्रमांकान्वये प्रसिध्द करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

1/6/09

**(प्रकाश साबळे)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

शिक्षण संचालक(प्राथ.),महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.),महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण उपसंचालक(सर्व विभाग).
शिक्षण उपसंचालक,जवाहर बालभवन,मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद(सर्व).
शिक्षणाधिकारी(प्राथमिक),जिल्हापरिषद(सर्व).
शिक्षणाधिकारी(माध्यमिक),जिल्हापरिष्द(सर्व).
आयुक्त,महानगरपालिका(सर्व).
शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी,नगरपालिका/नगरपरिषद(सर्व).
गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती(सर्व).
अधिक्षक,शालेय पोषण आहार,पंचायत समिती(सर्व).
निवडनस्ती.प्राशि-४.

# परिशिष्ट "अ"

**भरारी पथकाने शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात शाळा तपासणी करण्यासंदर्भातील नमूना--**

१) जिल्हयाचे नांव :

२) तालुका :

३) शाळेचे नांव व पत्ता :

४) भरारी पथक प्रमुखाचे नाव :

५) भरारी पथकातील इतर सदस्य :

६) शाळा तपासणीचा दिनांक व वेळ :

**तपासणी अहवाल**

| तपशील | शाळेची पटसंख्या | उपस्थित विद्यार्थी | आहार वाटप केलेली विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| इ.१ ली ते ५ वी | | | |
| इ.६ वी ते ८ वी | | | |

**शाळेमध्ये वाटप केलेल्या आहाराची माहिती**

१) नियमाप्रमाणे पुरेसा आहार दिला जातो काय? होय/नाही

२) विद्यार्थ्यांना वाटप केलेला आहार खाण्यास बेचव होता काय? होय/नाही

३) आहाराबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया कशा आहेत? चांगल्या/ब-या/वाईट

४) प्राथमिक वर्गासाठी प्रती विद्यार्थी १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम याप्रमाणे तांदुळ वापरण्यात आला काय? होय/नाही

५) आहाराचे वाटप विद्यार्थिनीकडून करण्यात येते काय? होय/नाही

६) शालेय पोषण आहार योजना राबविण्यासाठी स्थानिक जनतेचे सहकार्य मिळते काय? होय/नाही

७) प्रत्यक्ष आहार वाटप केलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना आहार वाटप करण्यात येते, असे दाखविण्यात येते काय? होय/नाही

८) आहार वाटपात मागील महिन्यामध्ये खंड पडला होता काय? होय/नाही

**<u>सर्वसाधारण मुल्यमापन</u>**

१) शालेय पोषण आहार योजना खालीलप्रमाणे राबवित असल्याचे आढळून आले:-

| उत्कृष्ट | चांगली | बरी | वाईट | गैरव्यवहार |
|---|---|---|---|---|

गैरव्यवहार असल्यास सविस्तर तपशील नमूद करावा____________________

________________________________________

________________________________________

## परिशिष्ट "ब"

जिल्हयाचे नांव :-
महिना :-

[Only in MS.excel format]

| भरारी पथकांनी तपासलेल्या शाळांची संख्या | शालेय पोषण आहार वाटप व्यवस्थित असलेल्या शाळांची संख्या | आहार वाटप व्यवस्थित नसलेल्या शाळांची संख्या | "क" स्तंभातील शाळांपैकी गैरव्यवहार होत असल्याचे आढळून आलेल्या शाळांची संख्या | "ड" स्तंभापैकी किती शाळांसंदर्भात संबंधितांवर कारवाई करण्यात आली/सुरु करण्यात आली | "क" स्तंभातील शाळांपैकी किती शाळांमध्ये आहार वाटपात सुधारणा करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली |
|---|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड.) | (इ) | (फ) |
| | | | | | |